<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

जा.क्र. ३६५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०७/२०१८

**१) गुन्हा करण्याच्या बेताने लोखंडी जुना वापरता देशी कट्टा व जिवंत काडतुस मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १८/०७/२०१८ चे ०१.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असुन गुन्हा करण्याच्या बेताने आपल्याजवळ एक लोखंडी जुना वापरता देशी कट्टा किंमती १५,०००/–रु. व दोन जिवंत काडतुस किंमती ४००/–रु. असा एकुण १५,४००/–रु. चे अग्नीशस्त्र बाळगतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. आडोळे जिल्हा रेड पथक पोलीस कार्यालय भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३/२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चुटे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) सायकलला लटकवलेली पैश्याची थैलि काढुन चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १८/०७/२०१८ चे १२.३०वा ते १२.४० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अर्बन बॅक येथुन त्याचे खात्यामधुन शेतीचे रोपवन करिता ३०,०००/–रु. काढुन कागदपत्रासह थैलिमध्ये ठेवुन सायकलचे हॅन्डलला लटकवुन सायकल चांभाराचे दुकानाजवळ ठेवुन छत्री दुरुस्त करण्याकरीता गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीची पैशाची थैली सायकलवरुन काढुन चोरुन नेल्याने फिर्यादी श्रावण शंकर आकरे वय ६७ वर्ष, रा. केसलवाडा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) लाचलुचपत विभागाची कारवाई : –**

दिनांक १८/०७/०१८ चे ११.५० वाजता यातील नमुद आरोपी क्र. १ याने तक्रारी प्रकाश दयाराम उईके यांना पडताळणी कार्यवाही वेळी त्यांना शासनाकडून मंजुर झालेल्या वाढीव कुटूंबाचे अनुदान म्हणुन २,९०,०००/–रु. चे धनादेश त्यांचे खात्यावर जमा केले, त्याचा मोबदला म्हणुन ४०,०००/–रु. लाचेची मागणी करुन ४०,०००/–रु. ची लाच रक्कम प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी आरोपी क्र. २ यांचे मार्फतीने स्विकारल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. भोसले एसीबी भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१२,१३(१) (ड),१३(२)लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. भोसले पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करुन रक्कमेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद : –**

सन २०१६ ते २०१७ पर्यन्त यातील आरोपी क्र १ ते ५ यांनी सृष्टी महिला ग्रामीन बिगर शेती सहकारी संस्था मर्या मासळ र.क्र. १२४१ संस्थेत नित्यानिधी बचत अधिकर्ता म्हणुन संस्थेत कार्यरत असतांना वसुली केलेली रक्कम सभासदाचे बॅक खात्यावर काही रक्कम भरुन उर्वरीत रक्कम संस्थेकडे सभासदाचे खात्यावर भरना न करता स्वत:च्या स्वार्थासाठी स्वत:कडे ठेवुन संस्थेची एकुण २३ लाख ५ हजार १३०/–रु. एवढया रक्कमेची फसवणुक केली आहे. अशा फिर्यादी गणेश मोतीराम हलमारे वय ३८ वर्ष, सहकारी संस्था पोलीस स्टेशन मागे साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४०८,४०९,४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गेडाम पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**५) जळाल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु : –**

दिनांक ०८/०७/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील मृतक मधुकर गोविंदराव शेंडे वय ७८ वर्ष, रा. माधवनगर खात रोड भंडारा हा आपले त्याचे राहते घरी बाथरुम मध्ये आंघोळीला गेला असता गिजर गॅस सुरु केले असता अचानक गिजर गॅसचा स्फोट होवुन छाती, पोट, दोन्ही मांडया जळाल्याने त्यास प्रथोमउपचार डॉ. रंगारी यांचे कडे करुन पुढील उपचारास ओरीयस हॉस्पीटल मेडीकल रोड नागपुर येथे दिनांक ०८/०७/२०१८ ला उपचारास भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ११/०७/२०१८ चे ०७.१५ वाजता मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चुटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून. मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १८/०७/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स जिप गाडी ही दवाखाना चौक गोबरवाही येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत.

**७) दारूच्या नशेत वाहन चालवीतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद–**

**अ)**दिनांक १८/०७/२०१८ चे १७.४० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही जि. प. चौक भंडारा येथे दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. शेख यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १८/०७/२०१८ चे १८.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध हातभट्टी ,देशी दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १८/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी, देशी दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, कारधा, तुमसर, साकोली, अडयाळ, येथे अवैध हातभट्टी, देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८९ हा.भ. दारू कि. ८,९०० /– रु. व ०१ लिटर ८० मिलीलीटर देशी दारू किंमती ३१२/– रु. तसेच जुगारातुन किंमती २,६९७/–रु. असा एकुण ११,९०९ /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १८/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवाशी– ०३तीन सिटर वाहनाकरीता– १३ ईतर वाहनांवरती – १०९ केसेस करण्यात आले आहे.

(वाय.एम.सोलसे)
**प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ७०३८०४६३९९**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.